MHLA050001622019

नियमीत दिवाणी दावा क्र. १५/२०१९
राम वि. महा. शासन वगैरे

**आदेश नि.क्र. ६० वर**

वादीने या अर्जाद्वारे नोंदणीकृत खरेदीखत क्र. २३६५/२०१० ला निशाणी देण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर प्रतिवादीने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. वादीच्या वकिलांचे म्हणणे असे की, प्रतिवादी क्र.४ ने खरेदीखत क्र. २३६५/२०१० दिनांक २९–७–२०१० रोजीचे अस्तीवात आल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे मान्य केलेल्या बाबी सिध्द करण्याची गरज नाही. त्यामुळे त्या खरेदीखतास निशाणी क्रमांक देण्यात यावा व ते पुराव्यात वाचण्यात यावे. प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तिवाद असा की सदरचे खरेदीखत कायदयाप्रमाणे पुराव्याअधारे सिध्द करून घेने आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

४. वादीच्या म्हणण्याप्रमाणे नि.क्र.३४ मधील परिच्छेद क्र.३ व ४ मध्ये प्रतिवादी क्र.४ ने खरेदीखत क्र. २३६५/२०१० करून घेतल्याचे मान्य केले आहे. निशाणी क्र. ३४ हा अर्ज वाचला. त्यामध्ये परिच्छेद क्र.३ मध्ये वादीने दाव्यातील परिच्छेद क्र.५ ते ७ मध्ये प्रतिवादी क्र.४ ने गुगदळ येथील

गट क्र. ९३ मधील ४८आर जमीन विकत घेतल्याचे नमूद केले आहे असे कथन प्रतिवादी क्र.५ ने केलेले आहे. त्यामध्ये कोठेही प्रतिवादी क्र.४ ने खरेदीखत करून घेतल्याचे स्वतःहून कथन केलेले नाही. त्यामुळे सदरचे खरेदीखत केल्याचे वादींनी पुराव्याअधारे सिध्द करणे आवश्यक आहे. म्हणून सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

अर्ज नामंजूर केला आहे.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2023.07.12 16:13:19 +0530

(प्र. अ. सवदीकर)

दिनांक १२/०७/२०२३. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.